महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

शुक्रवार ❖ १८ ऑक्टोबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - ११५ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::

९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com
news.thanejeevandeep@gmail.com

# भाजपची पहिली यादी आज ?

## महायुतीत जागावाटपाची चर्चा सुरूच !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसंदर्भात दिल्लीत सुरू असलेली भारतीय जनता पक्षाच्या निवडणूक समितीची बैठक संपली आहे. ही बैठक दोन तासांहून अधिक काळ चालली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील १५० जागांसाठी उमेदवार निश्चित करण्यात आले आहेत. मात्र, उमेदवार कधी जाहीर होतील याची घोषणा करण्यात आलेली नाही. राज्यातील प्रमुख नेते उपस्थित

पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा आणि पक्षाचे अध्यक्ष जेपी नड्डा आणि इतर सीईसी सदस्यांव्यतिरिक्त या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि राज्यातील काही प्रमुख नेते उपस्थित होते. सीईसीने त्या जागांवर चर्चा केली ज्यावर भाजप २८८ सदस्यांच्या विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभे करण्यास इच्छुक आहे अशी माहिती यावेळी सूत्रांनी दिली आहे.

**भाजप १५० जागांवर निवडणूक लढवण्याची शक्यता**

पक्ष सुमारे १५० जागा लढवेल, उर्वरित जागा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेससाठी सोडण्यात येतील अशी माहिती भाजपच्या सूत्रांनी दिली.

**त्याग करण्यास तयार राहा**

याआधी बावनकुळे म्हणाले की, युती टिकवण्यासाठी भाजपने जसा त्याग केला आहे, तसाच त्याग विधानसभा निवडणुकीसाठीही जागावाटपाच्या बाबतीत करायला हवा. ते म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खुल्या मनाने विचार करावा आणि त्याग करण्यासही तयार असावे. युती टिकवण्यासाठी आम्ही त्यागही केला आहे. याआधी आमच्याकडे असलेल्या जागांवर निवडणूक लढवण्याचे भाजपचे ध्येय असल्याचे स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे आणि २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

**महाराष्ट्रात किती मतदार?**

निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रात एकूण ९.५९ कोटी मतदार आहेत. तर ४.९५ कोटी पुरुष तर ४.६४ कोटी महिला मतदार आहेत. सप्टेंबर २२ रोजी दिलेल्या वृत्तानुसार, महाराष्ट्रात ५२,७८९ मतदान केंद्र उभारली जातील. ज्यापैकी ३९,०४८ मतदान केंद्रे ही ग्रामीण भागात तर १३,७४१ मतदान केंद्रे ही शहरी भागात असतील.

**२०१९ मध्ये ऑक्टोबरमध्ये झाल्या होत्या विधानसभा निवडणुका**

२०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणुका या ऑक्टोबर महिन्यात पार पडल्या होत्या. या निवडणुकांनंतर शिवसेना आणि भाजप यांच्यातील संघर्ष ताणला गेला होता. मुख्यमंत्रीपदावरुन झालेल्या वादातून शिवसेना आणि भाजपमधील युती तुटली होती. त्या दरम्यान अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी एकत्र येत सरकारही स्थापन केलं होतं. अवघ्या काही तासांतच अजित पवारांनी युटर्न घेतल्यामुळे हे सरकार पडलं. त्यानंतर महाविकास आघाडीचा प्रयोग महाराष्ट्रात झाला.



# खाजगी रुग्णालयांची सीजरसाठी आर्थिक लूट

## रुग्णालयांना आरोग्य विभागाची नोटीस

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**रायगड** : कोरोना काळात डॉक्टरांचं महत्त्व जसं सर्वसामान्यांना कळालं तसच, कोरोना कालावधीतच रुग्णांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या आणि लूट करणाऱ्या डॉक्टरांचाही चेहरा समाजासमोर आला. त्यामुळे, वैद्यकीय क्षेत्राबद्दल असलेला सेवाभाव किंवा आपुलकीपणाचा भाव कमी झाल्याचं दिसून येतय. त्यातच, कधी स्त्री भ्रूण हत्या असेल किंवा गर्भातील लिंगनिदान असेल, या घटनांमुळेही डॉक्टरांच्या भूमिका संशयास्पद राहिल्या आहेत. आता, रायगड जिल्ह्यातील काही खासगी डॉक्टरांकडून महिलांच्या प्रसुतीमध्ये मोठ्या प्रमाणात सीजर करण्यात आल्याने त्यांची भूमिकाही शंकास्पद वाटत असून याप्रकरणी संबधित डॉक्टरांना (अदृदे) कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. त्यामुळे, पुन्हा एकदा रुग्णालयांच्या आणि वैद्यकीय क्षेत्राच्या पान ४ वर ▶▶



# टीएमटीला भोवला ठेकेदाराचा आडमुठेपणा

## ठाणे मनपावर फेर निविदा काढण्याची नामुष्की | टेंडरमध्ये अडकल्या १६० वातानुकूलित बसगाड्या

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

ठाणे: ठाणे परिवहन सेवेत दाखल होणाऱ्या १६० वातानुकूलित बसेस टेंडरमध्ये अडकल्या आहेत. ठेकेदाराच्या आडमुठ्या भूमिकेमुळे प्रशासनाला फेरनिविदा काढावी लागल्याने काही महिने तरी ठाणेकरांना वातानुकूलित बसेसचे वाट पहावी लागणार आहे. ठाणे परिवहन सेवेचा २०२४-२५ चा ६९४ कोटी ५६ लाखांचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. परिवहन ताफ्यात पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून शून्य उत्सर्जन-प्रदूषण विरहित इलेक्ट्रीक बससह वातानुकुलीत ई बसचा समावेश करण्याची घोषणा यावेळी करण्यात आली होती. त्यानुसार ठाणे परिवहन सेवेच्या ताफ्यात १२३ ईलेक्ट्रीक बस दाखल झाल्याने सद्यस्थितीत टीएमटीच्या ४४६ बस प्रवाशांना सेवा देत आहेत. यात वित्त आयोगाच्या निधीतून ग्रॉस कॉस्ट कॉन्ट्रॅक्ट (जीसीसी) तत्वावर वातानुकुलित ईलेक्ट्रीक नऊ मीटरच्या १०० बस आणि पान ४ वर ▶▶

# तुकडेबंदीने झालेले व्यवहार नियमित करण्यासाठी ५ % रेडीरेकनर शुल्क

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**

शेतजमिनीच्या मालकांना दिलासा देण्यासाठी तुकडेबंदी कायद्यात शिथिलता आणण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. तुकडेबंदीचे व्यवहार नियमित करण्यासाठी रेडीरेकनर दराच्या २५ टक्के इतके शुल्क आकारण्यात येत होते. आता मात्र शासनाने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आता तुकडेबंदीचे व्यवहार नियमित करण्यासाठी रेडीरेकनरच्या २५ टक्क्यांऐवजी ५ टक्के इतके शुल्क नागरिकांना भरावे लागणार आहे.

महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्यासाठी शासनाने मंगळवारी (दि. १५) अध्यादेश प्रसिद्ध केला आहे. मागील वर्षी राज्य शासनाने शेतीसाठी निश्चित असलेले प्रमाणभूत क्षेत्र कमी करण्यात आले. त्यानुसार जिरायत जमीन ही कमीत कमी २० गुंठे आणि बागायत जमीन ही १० गुंठे खरेदी करता येणार आहे. मात्र, या नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीरपणे जमिनीचे तुकडे पाडून एक-दोन गुंठे जमिनीचे व्यवहार झाले. प्रामुख्याने शहरालगतच्या गावांमध्ये बेकायदा प्लॉटिंग करून अशा प्रकारचे व्यवहार मोठ्या प्रमाणात झाले आहेत. मात्र, पान ४ वर ▶▶

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. HISTORY, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

# बेहरे ग्रामपंचायत सरपंचपदी प्रियांका राऊत यांची निवड



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची निवडणूक बेहरे खडवली ग्रामपंचायत कायौलयात घेण्यात आली, सरपंच पदा करीता प्रियाका राऊत, शोभा चव्हाण व स्वाती जाधव हया तीघांनी अर्ज दाखल केले होते, छाननी नंतर दर्शना जाधव यांनी अर्ज मागे घेतला, त्या नंतर दोन उमदेवारांच्या चुरशीच्या निवडणुकीत प्रियांका राऊत विजयी झाले असुन त्यांना ११मते पडली तर शोभा चव्हाण यांना ५ मते पडली,मतदान प्रकियेला सदस्य दिपाली शेलार, चेतन शेलार, वनिता लांगे, प्रियांका राऊत,अनिल बांगर, नितीन गोरे,शोभा चव्हाण, चतुरा गायकवाड, गिता कडव,जगन कडव,नरेश कथोरे, आकाश सावंत, दर्शना जाधव,प्रियाका भोईर, स्वाती जाधव,स्वाती शेलार इत्यादी सोळा सदस्य उपस्थित होते, निवडणूक अधिकारी म्हणून दर्शना भावे यांनी कामकाज बघीतले, ग्रॅामविस्तार अधिकारी बी बी पष्टे यांनी सहकार्य केले,

नवनिर्वाचित सरपंच प्रियांका राऊत यांना शुभेच्छा पान ४ वर ▶▶




# आतकोली कचरा प्रकल्पास नागरीकांचा विरोध

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

पडघा दि.१७ (प्रतिनिधी ) भिवंडी तालुक्यातील पडघ्याजवळील आतकोली येथील ठाणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास परिसरातील नागरीकानी कडाडून विरोध केल्याने महापालिका प्रशासनात खळबळ उडाली आहे . आतकोली येथील ८४ एकर गुरचरण जमीनीवर ठाणे महानगर पालिकेच्या वतीने घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यात येणार असून ठाणे शहरातील कचरा येथे आणुन त्यावर त्यावर प्रक्रिया करणार आहेत त्याबाबत पोलीस प्रशासनाच्या मध्यस्थीने ठाणे महापालिका अधिकारी व परिसरातील नागरीकांची समन्वय सभा गुरुवारी पडघा येथील ग्रामसचीवालय सभागृहात घेण्यात आली यावेळी ठाणे शहरातील कचरा येथे पान ४ वर ▶▶

# डोंबिवलीतील बेकायदा बांधकामांविरुध्द आझाद मैदानात उपोषण





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

डोंबिवली - डोंबिवली पश्चिमेत बेसुमार बेकायदा बांधकामे उभी राहिली आहेत. काही सुरू आहेत. या बेकायदा बांधकामांच्या विरुध्द पालिका आयुक्तांपासून, उपायुक्त ते पालिकेच्या ह प्रभागात तक्रारी करूनही या तक्रारींची दखल पालिका प्रशासनाकडून दखल घेतली जात नाही, म्हणून एका जागरूक नागरिकाने याप्रकरणी मुंबईतील आझाद मैदानात या बेकायदा बांधकामांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

या बेमुदत उपोषणाचा गुरुवारी चौथा दिवस आहे. जोपर्यंत या बेकायदा बांधकामांच्या विरुध्द शासन कल्याण डोंबिवली पालिका आयुक्तांना या बेकायदा बांधकामांवर जमीनदोस्त करण्याची कारवाई करण्याचे आदेश देत नाही, तोपर्यंत हे बेमुदत उपोषण आझाद मैदान येथे सुरू राहणार आहे, अशी माहिती उपोषणकर्ते विनोद जोशी यांनी दिली.

गेल्या वर्षी याच बेकायदा बेकायदा बांधकामांच्या विरुध्द आपण आझाद मैदान येथे ४४ दिवसांचे उपोषण केले होते. त्यावेळी पालिकेने शासन आदेशावरून ही बेकायदा बांधकामे तोडण्याची कारवाई केली जाईल, असे आश्वासन आपणास दिले होते. त्यावेळी पालिकेच्या ह प्रभाग साहाय्यक आयुक्तांनी या बेकायदा बांधकामांवर पान ४ वर ▶▶

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा
मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7719814142
9130580111

# विषबाधा झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर - आयुक्त सौरभ राव

## अन्न व औषध प्रशासनाच्या अहवालानंतर दोषींवर कठोर कारवाई करणार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

ठाणे, (१७) : ठाणे महापालिकेच्या दिवा आगासन येथील शाळा क्र. ८८ मध्ये आज पोषण घेतल्यानंतर विद्यार्थ्यांन मळमळ होत असल्याची लक्षणे दिसून आली. सदर घटनेची तात्काळ दखल घेवून छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाची तज्ज्ञ डॉक्टरांची टीम शाळेत पोहचली व त्यांनी विद्यार्थ्यांची प्राथमिक तपासणी करुन प्रथमोपचार दिले. या शाळेतील विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली. तसेच सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत.

ठामपा शाळा क्र. ८८ दिवा आगासन या शाळेत सकाळच्या सत्रात इयत्ता पाचवी ते सातवीतील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनामध्ये खिचडी देण्यात आली. परंतु थोड्यावेळानंतर काही विद्यार्थ्यांना मळमळ होत असल्याची लक्षणे दिसून आली, या घटनेची तात्काळ दखल घेत छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अनिरुद्ध माळगांवकर यांच्यासह वैद्यकीय टीम शाळेत दाखल झाली. या टीमने तात्काळ सर्व विद्यार्थ्यांची तपासणी करुन त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. तर काही विद्यार्थ्यांना छत्रपती महाराज पान ४ वर ▶▶

## 'व्यक्ती विशेष'

# निघोज परिसरात विकास कामांची आवड असणारे अवलिया माऊली शेठ



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी) -**

पारनेरः निघोज परिसरातील सर्वच मंदीरे , कुंड परिसर , दशक्रिया विधी स्थळ , बाजार तळ , पालखी विसावा वा इतरत्र सातत्याने लक्ष देवून काही कमतरता , अस्वच्छता जाणविल्यास संबंधीतांच्या निदर्शनास आणून कामे मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करणारे , प्रसंगी पदरमोड करून खिश्याला झळ बसवून घेणारे , तसे दुर्मिळच , पण श्री मळगंगा मातेच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या श्री क्षेत्र निघोज नगरी मध्ये असे एक अवलिया आहेत , दुसरे , तिसरे कोणी नसून कोणत्याही पदावर कार्यरत नसलेले ज्ञानदेव लंके ऊर्फ माऊली शेठ होय .

महिन्यातील काही दिवस मुंबईतील कुलाबा येथे व्यवसाया निमित्त राहणारे व जास्तीत जास्त दिवस व क्षण आपल्या मातृभूमी असलेल्या श्री क्षेत्र निघोज नगरीला व ग्रामदैवत असलेल्या श्री मळगंगा मातेच्या सेवेला वाहून घेणारे प्रसिद्ध उद्योजक ज्ञानदेव लंके ऊर्फ माऊली शेठ यांना या परिसरात न ओळखणारा विरळच . गावातील श्री मळगंगा मातेचे सकाळी दर्शन घेतल्या नंतर श्री राम , श्री मारुती , श्री महादेव देवांच्या मंदीरात जावून नतमस्तक होवून श्रद्धा पुर्वक दर्शन घेवून येथे काही कमतरता आहे का ? पुरेशी स्वच्छता आहे का ? काही कामे करणे आवश्यक आहे का ? याकडे स्वतःच्या नजरेने व बारकाईने लक्ष देवून संबंधीतां कडून ही अपुरे कामे करून घेतली , म्हणून सातत्याने पाठपुरावा करणारे माऊली शेठ , वेळप्रसंगी कोणी मदत केली, तर घेतली , नाही केली , तर वेळप्रसंगी स्वत : च्या खिश्याला झळ सोसवून लोकसहभागातून अनेक विकास कामे मार्गी लावली . त्यात उल्लेखनीय काम म्हणजे गावातील कोणाही व्यक्ती चे निधन झाल्यानंतर होणाऱ्या दशक्रिया विधीसाठी जमा होणारे ग्रामस्थ व पै पाहुण्यांना ऊन , वारा , पाऊस यांच्याशी सामना करत उघड्यावर बसावे लागत असे , नेमकी ही बाब हेरून माऊली शेठ यांनी दशक्रिया विधीसाठी ४० x ९५ आकाराचे मोठे पत्र्याचे शेड ६ लाख १२ हजार रुपयांमध्ये उभे केले , याचा उपभोग आता खऱ्या अर्थाने सर्व जण घेतात , त्यामुळे याचा सर्व जण लाभ घेतात . त्याचबरोबर बाजार तळावर लोक वर्गणी व लोकसहभागातून ५ लाख ९० हजार रुपयांमध्ये मोठे पत्रा शेड उभे केल्याने बाजारकरूंबरोबर च इतरांनाही त्याचा उपयोग होवू लागला . तदनंतर गावचे ग्रामदैवत असलेल्या श्री मळगंगा माता मंदिरासमोरील अग्नी कुंडाच्या होमासाठी स्टिल चे रेलिंग २३ हजार ५०० रुपयांत उभे केल्याने मंदिराच्या वैभवात भर पडली . तर यात्रा उत्सव , नवरात्र उत्सव वा इतर वेळेस श्री मळगंगा मातेचा पालखी सोहळा ज्या वेळी कुंड पर्यटन स्थळी नेला जातो , त्या साठी पालखीला विसावा घेण्यासाठी मंदिरापासून कन्या विद्यालय व शासकीय प्राथमिक केंद्राजवळ पालखी विसावा बांधण्यात आला , त्यासाठी ४५ हजार रुपये खर्चून संरक्षण लोखंडी जाळी बांधून घेतली , त्यामुळे या पालखी मार्गाच्या वैभवात भर पडून संरक्षण ही झाले . कुंड रोड वरील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळे जवळ ५१ हजार रुपये खर्चून लवकरच गाय , वासरू यांचे राखोळी शिल्प उभे राहणार आहे . तर या कामांबरोबर च गावातील हिंदवी शिक्षण संस्थेच्या विद्यालयास शिक्षणासाठी ५१ हजार रुपयांची मदत स्वच्छेने केली आहे. माऊली शेठ आता सध्या कोणत्याही पद वा सत्ता स्थानावर नाही . तरी देखील पोट तिडकीने गावातील समस्या मांडून त्या मार्गी लावण्यासाठी झटत असतात . मध्यंतरी त्यांनी कुंड पर्यटन स्थळावरील जग प्रसिद्ध असलेले कुंडामधील रांजण खळग्यांमधील १३६ ट्रॅक्टर भरून मोठ्या प्रमाणावर कचरा बाहेर काढून परिसर स्वच्छ केल्याने परिसर लख्ख झाल्याने वैभवात भर पडली .

कोणतेही सार्वजनिक काम करताना ते मनापासून स्वतः वा लोकसहभागातून केल्याने त्याचा आनंद काही औरच असतो , श्री मळगंगा देवस्थान ट्रस्टचे माजी कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके ऊर्फ माऊली शेठ यांच्याकडे पाहून जाणवते , बोला श्री मळगंगा माते की जय . . . . .

# दिपेश म्हात्रे यांची रतन टाटा आणि कैकई घारडा यांना आदरांजली



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी) -**

कल्याण : बुधवारी सायंकाळी डोंबिवली पूर्वेतील सर्वेश हॉल येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि दिपेश म्हात्रे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योगपती रतन टाटा आणि कैकई घारडा (घारडा केमिकल्स) यांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात डोंबिवलीतील विविध मान्यवरांची उपस्थिती होती. सर्वांनी एकत्र येऊन या दोन महान व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा गौरव केला.

माजी स्थायी समिती सभापती दिपेश म्हात्रे आणि जे टाटा टेलीसर्व्हिसेसचे माजी अध्यक्ष माधव जोशी यांनी आपले विचार मांडले. रतन टाटा आणि कैकई घारडा यांच्या जीवनातील घटनांचा उल्लेख करत त्यांना आदरांजली वाहिली. दिपेश म्हात्रे यांनी आपल्या भाषणात म्हटले, 'रतन टाटा हे एक असामान्य व्यक्तिमत्त्व होते. ज्यांनी महानता आणि व्यावसायिक कौशल्य यांचे आदर्श उदाहरण प्रस्थापित केले. त्यांच्या दूरदृष्टीने केवळ औद्योगिक प्रगतीच नव्हे, तर समाजसेवा, शिक्षण, आरोग्य, आणि गरिबांच्या सेवेतही मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे लाखो लोकांचे जीवन सुधारले आहे. रतन टाटा यांनी दाखवले की व्यावसायिक यश आणि मानवतेची सेवा हे एकाच वेळी साध्य करता येते.'

त्यानंतर माधव जोशी यांनी टाटा यांच्याशी संबंधित अनेक आठवणी सांगितल्या, ज्यांनी उपस्थित सर्वांना भावूक केले. जोशी म्हणाले, 'टाटा यांच्यासोबत काम करताना त्यांच्या नेतृत्वगुणांचा आणि साधेपणाचा जवळून अनुभव घेण्याची संधी मिळाली. टाटा टेलीसर्व्हिसेसमध्ये काम करताना मला त्यांच्यासोबत घालवलेले अनेक क्षण अविस्मरणीय होते.'कार्यक्रमाच्या शेवटी, उपस्थित सर्वांनी रतन टाटा यांना भारत रत्न सन्मान प्रदान करण्यात यावा, अशी एकमुखी मागणी केली. टाटा यांनी देशासाठी केलेले अद्वितीय योगदान पाहता, हा सर्वोच्च नागरी सन्मान त्यांना मिळावा, असा आग्रह सर्वांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून रतन टाटा आणि कैकई घारडा यांच्या कार्याचे महत्त्व आणि त्यांचे योगदान लक्षात घेऊन त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी कामा संघटना एमआयडीसी उद्योजकांचे प्रतिनिधी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे, महाविकास आघाडीचे स्थानिक नेते आणि कार्यकर्ते डोंबिवलीतील समाजसेवक व उद्योगपती उपस्थित होते.

# 'स्त्रीचा सन्मान करणारी संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृती'

## - प्राचार्या डॉ. गुंफा कोकाटे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी) -**



पारनेर - स्त्रीचा सन्मान करणारी संस्कृती म्हणजे आपली भारतीय संस्कृती , असे अभिमानास्पद गौरवोद्गार श्रीरामपुर तालुक्यातील बेलापूर येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ . गुंफा कोकाटे यांनी काढले .

निघोज येथील श्री मुलिकादेवी महाविदयालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि बहिशाल शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बॅरिस्टर बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेत बोलताना प्राचार्य डॉ . गुंफा कोकाटे पुढे म्हणाल्या की , आयुष्य जगत असताना व स्पर्धा परीक्षेच्या युगात वावरत असताना , तुम्ही कोणतीही पद मिळवा , मोठे साहेब व्हा , पण आई-वडिलांना सन्मान वाटेल , असे कार्य करा. परिस्थितीची जाणीव ठेवली , तर माणूस खूप पुढे जातो. संत महात्म्यांनी खूप त्याग केला.

स्वतःला अभ्यासात, समाज सुधारणेत झोकून दिले. सन्मान मिळविले. आपणही करू शकतो. मानवता, समता या पलीकडे जाऊन सक्षमीकरणाच्या पायऱ्या चढू शकतो. आपण सर्वांनीच लैंगिक चौकटीतून बाहेर पडून समानतेने उभे राहिले पाहिजे. आज अवतीभवती खूप घटना घडत आहे. स्त्रियांवरील अत्याचार वाढत आहे. ज्ञान विज्ञानाच्या या क्षेत्रामध्ये मनोरंजन व वासनाधीनता वाढत चालली आहे. तुमचं आमचं एक नातं व एक रक्त आहे.

मग आपला समाज जागे कधी होणार , असा सवालही त्यांनी आपल्या व्याख्यानात केला. मुलगा काय , मुलगी काय वंशाचा दिवा एकच आहे. वाढत्या स्त्रियांवरील अत्याचार, स्त्री भृण हत्या व अनेक कारणांमुळे आज स्त्री - पुरुष प्रमाण कमी अधिक झाले आहे. खरे तर ही खूप चिंतेची बाब आहे. आपला तरुण व्यसन, राजकीय दंगली, हिंसाचार फिल्मी जगाचे आकर्षण, मोबाईलचा अतिवापर, धावपळीचा आहारामुळे आरोग्यावर घातक परिणाम होत आहेत. अशा विळख्यात अडकला आहे. या बाह्य आकर्षणाचे अनुकरण करत आहे. तरुणांनी अशा गोष्टींपासून सावध राहायला हवे. भारतीय संस्कृती प्रमाणे आपले आचरण असल्यास जीवन जगताना आपल्याला अडचणी कमी येतात. माणसाला माणूस म्हणून सन्मान देण्यासाठी संत महात्म्यांनी खूप परिश्रम घेतले.

आपणही इतरांना समान संधी, समान सत्ता, समान स्वातंत्र्य देणे गरजेचे आहे. आपल्या गावासाठी, आपल्या माणसांसाठी, आपल्या मातीसाठी काम केले पाहिजे, झटले पाहिजे. यातच सर्वांचे हित आहे. असे मत त्यांनी शेवटी व्यक्त केले.

प्राचार्या डॉ. गुंफा कोकाटे यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यांनी 'जिंकत गेले आयुष्य' हे पुस्तक महाविद्यालयास भेट दिले. अध्यक्षीय मार्गदर्शनामधून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांनी मुलींना शिक्षणासाठी प्रेरणा दिली पाहिजे. मुली शिकल्या तर देशाचा विकास होईल. मुलगी ही दोन गाव , दोन राज्य , दोन देश जोडण्याचे महत्वपूर्ण काम करते. महिलांमध्ये कोणतीही गोष्ट पूर्ण करण्यासाठी क्षमता असते, जिद्द चिकाटी यांच्या बळावर महिला आज विविध पदावर, देशपातळीवर खूप चांगल्या पद्धतीने काम करत आहेत. ज्या दिवशी आपण स्त्रीचा सन्मान करायला शिकलो. त्यादिवशी समजावे की , आपण जे शिकलो. गुरुजन आई-वडिल ांकडून जी दिशा मिळाली. माणूस म्हणून आपण सिद्ध झालो. असे ही प्राचार्य आहेर यांनी केले.

या कार्यक्रम प्रसंगी महा विद्यालयाची माजी विद्यार्थिनी कु. चित्रा घोडे यांनी पोलीस उपनिरीक्षक पद मिळवल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयातील डॉ. पोपट पठारे यांनी एन सी सी चे ट्रेनिंग नागपूर येथील कामठीपूर या ठिकाणी पूर्ण करून लेफ्टनंट ही पदवी मिळवली , त्याबद्दल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे नगर जिल्हा सचिव पदी ज्येष्ठ पत्रकार व दैनिक जनप्रवास चे पारनेर ग्रामीण चे प्रतिनिधी सुरेश खोसे पाटील यांची निवड झाल्याबद्दल प्राचार्य डॉ . सहदेव आहेर व प्राचार्या डॉ . गुंफा कोकाटे यांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. सर्व मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, समन्वयक प्रा. संगीता मांडगे यांनी केले. सुंदर व नेट नेटके सूत्रसंचालन प्रा. नूतन गायकवाड यांनी केले , तर आभार प्रा. मनीषा गाडीलकर यांनी मानले. या प्रसंगी डॉ. मनोहर एरंडे, डॉ. प्रवीण जाधव, प्रा. स्वाती मोरे, डॉ. दुर्गा रायकर, प्रा. अशोक कवडे, प्रा. सचिन निघुट, प्रा. अक्षय अडसूळ , प्रा. आनंद पाटेकर, प्रा. निलिमा घुले, प्रा. आश्विनी सुपेकर, प्रा. नम्रता थोरात, प्रा. अपेक्षा लामखडे, प्रा. अमृता दौंडकर, प्रा. वृषाली जगदाळे, प्रा. निकिता सुरोशे, प्रा. रूपाली गोरडे, प्रा. पुनम गंधाक्ते, प्रा. स्वाती पवार, प्रा. हर्षदा पंडित, प्रा. सुनंदा गाडीलकर, प्रा. सुप्रिया सालके, डॉ. गोरक्ष घोलप, प्रा. दीपक खामकर, प्रा. सुरेश गाडीलकर, प्रा. प्रवीण सरडे, श्री. नवनाथ घोगरे, संदीप लंके ,अक्षय घेमुड, किशोर बाबर , प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडणूक प्रक्रिया होईपर्यंत धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध

पेणः विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूकिची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संपूर्ण रायगड जिल्ह्यात सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय,संस्था, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध घालण्यात आले असल्याचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज जारी केले.

मा.भारत निवडणूक आयोगाने दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या प्रसिध्दी पत्रकान्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषीत केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. रायगड जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदार संघातील निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हादंडाधिकारी, पविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावर कोणत्याही राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा त्याच्या हितचिंतकाने धरणे, आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निबंध घालणे आवश्यक होते. असल्याची माझी खात्री झाली आहे. तसेच सर्व संबंधितांना नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेणे सद्यःस्थितीत शक्य नसल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी एकतर्फी आदेश काढणे आवश्यक असल्याची खात्री करून घेतली आहे. जिल्हादंडाधिकारी रायगड यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन निर्बंध आदेश जारी केले आहेत.

# रमेश नाईक समाजभूषण पुरस्काराने सन्मानीत




कल्याण : महावितरणचे कर्मचारी रमेश नाईक यांना राष्ट्रीय स्तरावरील समाजभूण पुरस्काराने सोमवारी कोल्हापूर येथे सन्मानीत करण्यात आले. हा पुरस्कार आमदार सतेज पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला यावेळी राजयोगिनी ब्रंम्हकुमारी सुनंदादीदी,राज्य कामगार कल्याण मंडळ आयुक्त रविराज इळवे, विशाल घोडके, हरीचंद्र धोत्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

रमेश नाईक महावितरणच्या भांडूप परिमंडळात सहाय्यक लेखापाल पदी कार्यरत असुन ते कल्याणचे रहीवाशी आहेत. सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले नाईक यांना यापुर्वी अनेक राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहेत.समाजभूषण पुरस्काराने सन्मानीत झाल्याने नाईक यांचे सर्व थरातून अभिनंदन होत आहे.

# डोंबिवली एमआयडीसीत ६ फूटी नागाला जीवनदान

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी) -**

कल्याण : बुधवारी दुपारी तीनच्या सुमारास डोंबिवली पूर्वेतील सागांव येथील बाळकृष्ण इंडस्ट्रीज, एमआयडीसी फेज २ च्या आवारात तेथील कामारांना साप फिरताना आढळला.लगेच तेथील कामगारांनी याची माहिती सेवा संस्थेत कळवली. काही वेळात सेवा संस्थेचे सदस्य पुर्वेश कोरी, सुभाष पांडियन, भूषण रानडे आणि राजू केन हे घटना स्थळी पोहोचले.

प्रथम दर्शनी पाहणी केली असता या ठिकाणी सुमारे ६ फुटाचा भलामोठा नाग हा विषारी जातीचा साप आढळला.सेवा संस्थेचा सदस्यांनी नागाला सुरक्षित पद्धतीने पकडले व तेथील कामगारांना सापांचा बद्दल असलेले गैरसमज दूर करून जनजागृतीचे काम केले. वाढत्या शहरीकरणामुळे सापांचे नैसर्गीक आधीवास हे नष्ट होत असल्या कारणस्तव साप हे



भक्ष्याच्या शोधत मानवी वस्तजवळ येण्याचा घटना फार वाढत आहेत. या नागाची योग्यती तपासणी व नोंद करून वनविभागाच्या परवानगीने नागाला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. तसेच कोणताही साप आढळल्यास त्याला हानी न करता सर्प मित्रास बोलवावे. जेणे करून त्यांना पुन्हा त्याच्या नैसर्गिक अधिवास सोडता येईल असे आवाहन करण्यात आले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित


**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | अभ्यासक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी अॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी

संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558




१८ ऑक्टोबर २०२४
शुक्रवार

**मेष**
दिवस तुमच्यासाठी खास असणार आहे. नवीन काम सुरू करण्यासाठी दिवस चांगला जाईल. तुम्हाला कायदेशीर प्रकरणात विजय मिळण्याची शक्यता आहे.

**वृषभ**
दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. तुमच्या मुलाच्या नोकरीशी संबंधित कोणतीही समस्या हाताळण्यात व्यस्त असाल. शांततेने विचार करा.

**मिथुन**
खाजगी नोकरीत काम करणाऱ्यांना प्रमोशन मिळू शकते. दिवस संमिश्र जाणार आहे. व्यवसायात कोणावरही आंधळेपणाने विश्वास ठेवू नका.

**कर्क**
काही मुद्द्यावरून कुटुंबातील काही सदस्यांवर नाराज राहाल. विद्यार्थ्यांना अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे लागेल. मुलांशी काही मुद्द्यावर वाद होऊ शकतो.

**सिंह**
सासरच्या व्यक्तींशी असलेल्या तक्रारी दूर करण्याची संधी मिळेल. तुमच्या कार्यक्षेत्रात तुमच्या आवडीचे काम मिळाल्याने आनंद होईल.

**कन्या**
एखादी चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे. आज तुमच्या मेहनत आणि शहाणपणामुळे तुमच्या आशा आणि अपेक्षा पूर्ण होतील.

**तूळ**
सर्व ठीक होईल.दिवसाची सुरुवात थोडी कमकुवत असेल, नफा मिळाल्यास तुम्ही आनंदी व्हाल. नवीन वाहन घेण्याचे तुमचे स्वप्न पूर्ण होईल.

**वृश्चिक**
दिवस तुमच्यासाठी अनुकूल असणार आहे. प्रगतीचे नवीन मार्ग उघडतील. विद्यार्थ्यांनी अभ्यासावर पूर्ण लक्ष केंद्रित करावे, लवकरच परीक्षेत यश मिळेल.

**धनु**
आवडत्या कार्यात रस राहील. आनंद वाटेल. जर तुम्ही आधी एखाद्याला पैसे उधार दिले असतील तर तुम्हाला ते पैसे परत मिळतील.

**मकर**
तुम्हाला तुमची प्रतिमा आणखी सुधारण्याची संधी देखील मिळेल. प्रिय मित्र समस्येवर उपाय शोधेल. तुमचे विचार कोणाशी तरी शेअर कराल.

**कुंभ**
कोणतेही ध्येय साध्य करण्यासाठी अनुभवी व्यक्तीची मदत मिळेल. तुमचा अहंकार आणि रागावर नियंत्रण ठेवाल आणि अनावश्यक खर्च टाळाल.

**मीन**
तुम्हाला तुमच्या व्यवसायाचा विस्तार करण्याच्या नवीन संधी मिळतील. आज तुम्हाला अचानक एखाद्याला दिलेले पैसे परत मिळू शकतात.

# राजे संस्कार प्रतिष्ठानने केला स्वतंत्र नवदुर्गाचा सन्मान



ठाणे : समाजात अनेक महिला अशा आहेत ज्या पती हयात नसतानाही स्वबळावर हिमतीने संकटावर मात करून लढत आहेत. अशा महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी राजे संस्कार प्रतिष्ठानने नवरात्रौत्सवाचे औचित्य साधून स्वतंत्र लढाऊ नवदुर्गाचा भाजपा आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन त्यांना आणखी बळ दिले. राजे संस्कार प्रतिष्ठानने सालाबाद प्रमाणे यंदाही नवदुर्गाचा सन्मान सोहळा आयोजित केला होता. ठाण्यातील वर्तकनगर येथील साईबाबा मंदिर सभागृहात संस्थेच्या वतीने एक पालकत्व, पतीच्या निधनानंतर दुर्गेचा अवतार धारण करून समाजाशी, परिस्थितीशी लढा देत संघर्ष करत आपल्या लेकरांना मोठया पदापर्यंत पोहचविणाऱ्या बारकूबाई नगीन साळवी, लक्ष्मी बळीराम राणे, अपर्णा अनंत मोरे, लता रंजन कांबळे, अलका पवन जोईल, सरिता अनंत पाटील, सुंदराबाई रंगनाथ कांबळे, छाया चंद्रशेखर पिल्ले, श्रीमती इंदिरा पित्रोडा या नऊ दुर्गांचा, महिलांचा सन्मान आमदार निरंजनजी डावखरे, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे अध्यक्ष सचिनजी मोरे , आगरी सेनेचे महाराष्ट्र सम्पर्क प्रमुख मनोजजी साळवी यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी आमदार निरंजन डावखरे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात संस्थेच्या उत्तम कार्याबद्दल शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेमार्फत 'हिरकणी ' हा पुरस्कार देखील सुरु करावा अशी इच्छाही व्यक्त केली.

सचिनजी मोरे यांनी संस्थेच्या कार्याबाबत कौतुक केले व असेच कार्य यापुढेही घडत राहो अशा शुभेच्छा दिल्या . यावेळी दिशा संगीत अकॅडमी च्या संचालिका श्वेता सावंत यांच्या भक्तिपर गीतांचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा योगिता कुंभार यांनी केले, प्रस्थाविक प्रा संगीता रोकडे तर. आभार संस्थेचे अध्यक्ष प्रा संभाजी शेळके यांनी मानले.या कार्यक्रमास वर्तकनगर साईबाबा मंदिर ट्रस्ट चे संचालक मिलिंद नईबागकर, के .बी पी कॉलेजचे प्राचार्य संतोष गावडे, संजय पाटील, ॲड मनोज बडगुजर, प्रा आनंद शिंदे ,प्रा विजय पगारे, राजेंद्र काकडे , विकास सातपुते, राजन पाटील, महेश शिराळकर, अशोक कांबळे ,प्रा प्रियांका ठाकरे, प्रा विशाखा मोरे ,प्रा जयश्री देशमुख, प्रा डिगे, प्रा नीता गावडे इ मान्यवर उपस्थित होते.

# संगणकाचे जनक



चार्ल्स बॅबेज केएच एफआरएस (२६ डिसेंबर १७९१ - १८ ऑक्टोबर १८७१) एक इंग्रजी पॉलिमॅथ होता.गणितज्ञ, तत्त्वज्ञ, शोधक आणि यांत्रिक अभियंता, बॅबेज यांनी डिजिटल प्रोग्राम करण्यायोग्य संगणकाची संकल्पना मांडली.

बॅबेजला काही लोक ' संगणकाचे जनक ' मानतात.त्याला प्रथम यांत्रिक संगणक , डिफरन्स इंजिनचा शोध लावण्याचे श्रेय दिले जाते, ज्यामुळे अखेरीस अधिक जटिल इलेक्ट्रॉनिक डिझाइन तयार झाले, जरी आधुनिक संगणकाच्या सर्व आवश्यक कल्पना त्याच्या विश्लेषणामध्ये सापडल्या आहेत. इंजिन , जॅकवर्ड लूममधून उघडपणे घेतलेले तत्त्व वापरून प्रोग्राम केलेले.बॅबेजला त्याच्या १८३२ च्या इकॉनॉमी ऑफ मॅन्युफॅक्चर्स अँड मशिनरी या पुस्तकात संगणकावरील कामाव्यतिरिक्त अनेक रूची होती . तो लंडनमधील सामाजिक दृष्टीकोणातील एक महत्त्वाचा व्यक्तिमत्व होता, आणि फ्रान्समधून 'वैज्ञानिक सोइरी' आयात करण्याचे श्रेय शनिवारी संध्याकाळच्या संध्याकाळच्या सोईरीससह दिले जाते .

इतर क्षेत्रातील त्यांच्या विविध कार्यामुळे त्यांना त्यांच्या शतकातील अनेक बहुपयोगी लोकांमध्ये 'प्रसिद्ध' म्हणून ओळखले जाते.बॅबेज, त्याच्या डिफरन्स इंजिन आणि ॲनालिटिकल इंजिनसह त्याच्या अनेक डिझाईन्सच्या पूर्ण यशस्वी अभियांत्रिकीपूर्वी मरण पावले,

संगणकाच्या कल्पनांमध्ये एक प्रमुख व्यक्तिमत्व राहिले.

त्याच्या अपूर्ण यंत्रणेचे काही भाग लंडनमधील विज्ञान संग्रहालयात प्रदर्शित केले आहेत . १९९१ मध्ये, मूळ योजनांमधून एक कार्यशील फरक इंजिन तयार केले गेले.

१९व्या शतकात साध्य करता येण्याजोग्या सहिष्णुतेसाठी तयार केलेले , पूर्ण झालेल्या इंजिनच्या यशाने सूचित केले की बॅबेजचे मशीन कार्य केले असते. बॅबेजची मशीन ही पहिल्या यांत्रिक संगणकांपैकी होती. ते प्रत्यक्षात पूर्ण झाले नाहीत हे मुख्यत्वे निधीच्या समस्या आणि व्यक्तिमत्त्वाच्या संघर्षामुळे होते, विशेषतः जॉर्ज बिडेल एअरी, खगोलशास्त्रज्ञ रॉयल यांच्याशी.बॅबेजची यंत्रे यांत्रिक आणि अनाठायी असली तरी त्यांची मूळ वास्तुकला आधुनिक संगणकासारखीच होती. डेटा आणि प्रोग्राम मेमरी विभक्त करण्यात आली होती, ऑपरेशन सूचना-आधारित होते, कंट्रोल युनिट कंडिशनल जंप करू शकते आणि मशीनमध्ये स्वतंत्र I/O युनिट होते.

# माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात रायगडातील ३,५००शाळांसह हजारो विद्यार्थी व शिक्षकांचा सहभाग

पेण : विविध स्पर्धात्मक उपक्रमावर आधारित 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' है अनोखे अभियान राज्यात मागील वर्षापासून राबविण्यास सुरुवात झाली आहे. सन २०२३- २४ मध्ये या अभियानाचा पहिला टप्पा अत्यंत यशस्वी ठरला. सुमारे ९५ टक्के शाळांमधील विद्यार्थी या अभियानात सहभागी झाले होते. त्यातील काही उपक्रमांची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये देखील झाली आहे. २६ जुलै २०२४ शासन निर्णयान्वये सन २०२४-२५ मध्ये देखील मागील वर्षी प्रमाणेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा दोन हे स्पर्धात्मक अभियान काही नवनवीन उपक्रमासह राबविण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा दोन हे अभियान ५ ऑगस्ट २०२४ ते ६ सप्टेंबर २०२४ या कालावधी दरम्यान शाळांमध्ये राबविण्यात आले आहे.

या उपक्रमास देखील शाळांनी व विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. यावर्षीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये सुमारे ३ हजार ५०० शाळांमधून सुमारे ४५ हजार विद्यार्थी व सुमारे १८ हजार ५०० शिक्षक या अभियानाच्या विविध उपक्रमात सहभागी झाले होते. दुसऱ्या टप्प्यासाठी पायाभूत सुविधा शासन ध्येयधोरण अंमल बजावणी आणि शैक्षणिक संपादणूक या प्रमुख घटकावर आधारित एकूण १५० गुणांची विविध स्पर्धात्मक उपक्रम निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार शाळांचे प्रत्येक स्तरावर काटेकोरपणी समित्याकडून मूल्यमापन होऊन या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात शासकीय आणि खाजगी या दोन्ही वर्गवारीतून विभाग, जिल्हा पातळीवरील विजेत्या शाळांची यादी आज जाहीर करण्यात आली असून त्या सर्व विजेत्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड व शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती पुनिता गुरव यांनी अभिनंदन केले आहे.राज्यस्तरावर मुंबई विभागातून विभाग स्तरावर शासकीय गटातून रायगड जिल्ह्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडगाव ता.खालापूर ही शाळा द्वितीय क्रमांक पटकावून सदर शाळेस १५ लाख रुपयांचे पारितोषिक मिळालेले आहे. त्याचप्रमाणे खाजगी गटातून श्री मोहनलाल सोनी माध्यमिक विद्यालय बोर्ली पंचतन ता.श्रीवर्धन या शाळेचा मुंबई विभाग स्तरावर तृतीय क्रमांक आलेला आहे. या शाळेला ११ लाख रुपये पारितोषिक जाहीर झाले आहे. या शाळांचे बक्षीस वितरण मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व मा. मंत्री (शालेय शिक्षण) महाराष्ट्र राज्य, यांच्या हस्ते सोमवार दि. १४ ऑक्टोबर २०२४ रोजी नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स नरिमन पॉईंट मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात वितरीत करण्यात आले.

रायगड जिल्ह्यामध्ये शासकीय शाळा गटातून प्रथम क्रमांक माथेरान गिरीश स्थान नगर परिषदेचे वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर माथेरान येथील नगरपरिषद प्राथमिक शाळा या शाळेचा असून याशाळेला ११ लाख रुपये पारितोषिक जाहीर करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे द्वितीय क्रमांक रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खारपाडा ता.पेण या शाळेचा असून या शाळेस ५ लाख रुपये पारितोषिक देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे तृतीय क्रमांक रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोल मोडले ता. श्रीवर्धन या शाळेने तीन लक्ष रुपये चे पारितोषिक पटकावले आहे. खाजगी शाळा गटातून श्रीराज एज्युकेशन ट्रस्ट ता. सुधागड या शाळेचा प्रथम क्रमांक आला असून ११ लाख रुपये चे पारितोषिक पटकावले आहे. चांगु काना ठाकूर विद्यालय पनवेल या शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला असून या शाळेत ५ लाख रुपये बक्षीस देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे आशा किरण इंग्लिश मिडियम स्कूल पानेड ता. पेण या शाळेने तृतीय क्रमांक पटकावला असून सदर शाळेस ३ लक्ष रुपये पारितोषिक देण्यात येत आहे. याव्यतिरिक्त तालुकास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय असे क्रमांक शासकीय शाळा व खाजगी शाळा स्तरादरम्यान जाहीर केले जातील आणि प्रथम क्रमांकास ३ लाख रुपये द्वितीय क्रमांक २ लाख रुपये व तृतीय क्रमांक एक लाख रुपये असे पारितोषिक देण्यात येईल रायगड जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणामध्ये या अभियानासाठी शाळा, शिक्षक विद्यार्थी यांनी सहभाग नोंदविला आहे. त्या सर्वांचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती पुनिता गुरव यांनी अभिनंदन केले आहे त्याचप्रमाणे सर्व विभाग स्तर जिल्हास्तर व तालुकास्तर विजेत्या शाळांचे अभिनंदन केलेले आहे

# ठाणे जिल्ह्यात मतदारांची संख्या वाढली



ठाणे : लोकसभा निवडणुकीच्यावेळी राबविण्यात आलेल्या निरंतर मतदार नोंदणी कार्यक्रमांतर्गत मतदारांच्या संख्येत वाढ होऊन जिल्ह्यातील मतदारांची संख्या ६८ लाख एक हजार २४४ वर पोहोचली.त्यानंतरदेखील आयोगाच्या सूचनेनुसार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम घोषित केला होता. या कार्यक्रमांतर्गत मतदारांनी मतदान नोंदणीकडे भर दिल्याने तीन लाख ४५ हजार ४८४ नवीन मतदारांची वाढ झाल्याचे दिसून येत आहे.तर दुसरीकडे लोकसभा निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्रांबाहेर लागलेल्या मतदारांच्या रांगा लक्षात घेत मतदान केंद्र वाढविण्याचा निर्णय घेत विधानसभा निवडणुकीत मतदान केंद्रांची संख्येत साडेतीनशेहून अधिक वाढ झाली आहे.

मतदान प्रक्रियेला गती देण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी दिली.

ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांतील निवडणूक तयारीची माहिती जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी बुधवारी (ता. १६) पत्रकार परिषदेत दिली. ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी सज्ज झाला आहे. या ठिकाणी आचारसंहितेच्या अंमल बजावणीसाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात तीन सत्रात प्रत्येकी तीन याप्रमाणे नऊ पथक असणार आहेत. यामध्ये एक जिल्हा नोडल अधिकारी, विधानसभा मतदारसंघनिहाय नोडल अधिकारी असणार आहे.

ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांत ७१ लाख ५५ हजार ७२८ इतके मतदार आहेत. त्यामध्ये ३८ लाख १३ हजार २६४ पुरुष, ३३ लाख ४१ हजार ७० महिला, १३९४ इतर मतदार आहेत. यामध्ये १८ ते १९ वयोगटातील मतदारांची संख्या एक लाख ६५ हजार ५९७ इतकी आहे. अपंग मतदारांची संख्या ३७ हजार ८५४ इतकी, तर ८५ पेक्षा जास्त वयोगटातील मतदारांची संख्या ५७ हजार २०९ इतकी आहे. ओवळा-माजिवडा मतदारसंघात सर्वाधिक म्हणजेच पाच लाख ४० हजार २९३ मतदार आहेत, तर उल्हासनगर मतदारसंघात सर्वात कमी म्हणजेच दोन लाख ८० हजार ८५२ इतके मतदार आहेत, अशी माहिती शिनगारे यांनी दिली.

ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील दोन हजार २६८ ठिकाणी एकूण सहा हजार ८९४ मतदान केंद्र उभारण्यात येणार आहेत. यामध्ये पक्क्या इमारतीतील केंद्रांची संख्या पाच हजार ३०३, पार्टीशिनमधील मतदान केंद्रांची संख्या एक हजार २०४, मंडपातील मतदान केंद्राची संख्या ३८७, गृहनिर्माण संकुलातील मतदान केंद्रांची संख्या ३३७, झोपडपट्टी वस्त्यांमधील मतदान केंद्रांची संख्या २५२ इतकी आहे. त्याचबरोबर निवडणुकीसाठी आवश्यक असलेले ३५ हजार कर्मचारी वर्गही उपलब्ध आहे. मतदान केंद्रावर मतदारांची गैरसोय होऊ नये, यासाठी पाणी, बसण्यासाठी बाकडे, अशी व्यवस्था करण्यात येणार आहे.

पुनर्मतदार नोंदणी कार्यक्रम जिल्ह्यातील १८ ते १९ वयोगटातील मतदारांमध्ये १३ हजार ३६१ इतकी वाढ झालेली आहे. ३ मे २०२४ रोजी मतदारांची संख्या एक लाख पाच हजार ९६६ इतकी होती, तर ६ ऑगस्ट २०२४ रोजी मतदारांची संख्या एक लाख १९ हजार ३२७ इतके होते. निवडणूक विभागाकडून पुनर्मतदार नोंदणी कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या कार्यक्रमात ४६ हजार २७० मतदारांची वाढ झाल्याने नव मतदारांची संख्या थेट एक लाख ६५ हजार ५९७ इतकी झाली आहे.

# आरपीआयचे सुरेश जाधव व रत्नाकर भालेराव यांची विशेष निमंत्रित सदस्य म्हणून पालघर जिल्हा निवड



पालघरः जिल्ह्याची नुकतीच नियोजन समितीच्या बैठक पार पडली. या बैठकीत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, आरपीआयचे जिल्हा अध्यक्ष सुरेश जाधव आणि कार्याध्यक्ष रत्नाकर भालेराव यांची समितीच्या विशेष निमंत्रित सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. या निवडीचे महत्व पाहता, सुरेश जाधव आणि रत्नाकर भालेराव यांच्याकडे राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनुभव असून, जनतेच्या समस्यांवर अधिक प्रभावीपणे काम केले जाणार असल्याचे आरपीआयचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी जनतेच्या समस्यांशी जवळून परिचित असल्याने, त्यांच्या सहभागामुळे जिल्ह्याच्या विकासाच्या योजना अधिक जनहित कार्य होतील, अशी अपेक्षा आरपीआय पालघर जिल्हा अध्यक्ष सुरेश जाधव यांनी व्यक्त केली .तसेच सुरेश जाधव याना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा देण्यासाठी पत्रकार ऋषीकेश जाधव , कल्पेश गायकवाड व अक्षय मंस्के इंजिनियर यांनी सुरेश जाधव ह्यांच्या कार्यलयात जाऊन शुभेच्छा देण्याल आल्या, सुरेश जाधव पत्रकाराशी बोलताना म्हणाले की, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या पाठपुराव्यामुळे व राज्यांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी पाठपुरावा व संवाद नेहमीच साधत असताना, अखेरीस पालघर जिल्हा नियोजन समितीत सदस्य म्हणून निवड झाल्या मुळे त्या बद्दल त्यांचे आभार व्यक्त केले.

# शुक्रवारी कल्याणात रंगणार दिव्यांग मुलांच्या कलामहोत्सवात 'यहाँ के हम सिकंदर'

कल्याण : बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीच्या अध्यक्षा ॲड. निलम शिर्के सामंत यांच्या संकल्पनेतून दिव्यांग मुलांचा कलामहोत्सव महाराष्ट्रात ५ ऑक्टोंबर पासून सर्व शहरात सुरू आहे. बालरंगभूमी परिषद कल्याण शाखेनेही या दिव्यांग कलामहोत्सवाचे आयोजन शुक्रवारी १८ ऑक्टोंबर रोजी कल्याणच्या आचार्य अत्रे रंगमंदिर कल्याण (प.) येथे सकाळी १०.३० ते २ वाजेपर्यंत आयोजित केले आहे.

या महोत्सवात १३ दिव्यांग शाळांचा सहभाग असून २०० दिव्यांग बालकलाकारांनी सहभाग घेतला आहे. दिव्यांग मुलांच्या कला कौशल्याला वाव देण्यासाठी बाल रंगभूमी परिषदेने 'यहाँ के हम सिकंदर' कला महोत्सवाच्या माध्यमातून दिव्यांग बालकलाकारांना सांस्कृतिक रंगमंच उपलब्ध करून दिला आहे. १८ वर्षाखालील बाल कलाकारांद्वारे नृत्य, नाट्य, चित्रकला, गायन, वादन यासारख्या कला सादर होणार आहेत. या महोत्सवाचे स्वरूप स्पर्धात्मक नसून महोत्सवात सहभागी सर्व शाळांना ५ हजार रुपये मानदेय, सन्मान चिन्ह व सहभागी सर्व बाल कलावंताना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक शाळेच्या एक शिक्षकाचा सन्मान केला जाणार आहे.महोत्सवाचे उदघाटन १८ ऑक्टोंबर रोजी सकाळी १०.३० वाजता होणार असून अध्यक्षा अँड निलम शिर्के सामंत व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत अशी माहिती कल्याणच्या बालरंगभूमी परिषदेचे कार्याध्यक्ष शिवाजी शिंदे यांनी दिली. तसेच यावेळी दिव्यांग मुलांनी बनविलेल्या वस्तूंचे प्रदर्शनाचेही आयोजन केले आहे. या दिव्यांग कला महोत्सवात बाल कलावंतांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी नागरिकांनी आवर्जून उपस्थित रहावे व मुलांनी बनविलेल्या वस्तू खरेदी करून त्यांचा आनंद द्विगुणित करावा असे आवाहन अध्यक्ष ॲड. निलम शिर्के सामंत व बाल रंगभूमी कल्याण शाखेचे सतिश देसाई, शिवाजी शिंदे, प्रीती बोरकर, सुजाता कांबळे डांगे व योगेश कल्हापुरे यांनी केले आहे.

# अभाविपद्वारे आयोजित 'जनजाती गौरव यात्रा २०२४' चा उद्घाटन समारंभ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) –**

मुरबाड : बुधवार दि.१६ ऑक्टोबर २०२४ च्या सकाळी ठीक १०:०० वाजता, अभाविपद्वारे आयोजित 'जनजाती गौरव यात्रा २०२४' चा उद्घाटन समारंभ, कल्याण जिल्ह्यातील, न्यू इंग्लिश ज्युनिअर कॉलेज, मुरबाड (ता. मुरबाड) येथे संपन्न झाला. उद्घाटन समारंभपश्चात 'जनजाती गौरव रथा'चे पूजन करीत, उपस्थित मान्यवरांद्वारे रथास पुढील यात्रेसाठी मार्गस्थ केले गेले. गोंड साम्राज्याचे वंशज आणि वर्तमान मध्य प्रदेश शासनाचे अतिरिक्त मुख्य सचिव श्री.लक्ष्मणसिंह मारकम, मुरबाड विधानसभेचे आमदार श्री.किसन कथोरे, मुंबई विद्यापीठ अधिसभा सदस्य श्री.रविंद्र घोडविंदे, मुरबाडचे पूर्व नगराध्यक्ष श्री मुकेश विशे, जनजाती गौरव यात्रा सत्येश भला, अभाविप कल्याण जिल्हा संयोजक अभिषेक राठोड आदी. त्यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. भव्य उद्घाटन सोहळ्यास उपस्थितांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



> सदर यात्रा आजच्या पहिल्या दिवशी, मुरबाड तालुक्यातील मुरबाड शहर व म्हसा, धसई, सरळगाव आणि चेरपोली पंचक्रोशींमध्ये विविध स्थानांवर प्रवास करीत आहे.

# कळवे येथील तरुणाचे १२ वर्षीय चिमुकलीसोबत अश्लील चाळे

पेण : पेण तालुक्यातील दादर सागरी पोलीस स्टेशन हद्दीत राहणारी १२ वर्षीय चिमुकली बेडरूम मध्ये झोपली असताना कळवे येथील ३५ वर्षीय तरुण सचिन पेंटर नामक आरोपीने घराच्या बेडरूममध्ये प्रवेश करत सदर अल्पवयीन मुलीच्या अंगाला हात लावून अश्लील चाळे केले. मात्र फिर्यादीच्या सदर बाब निदर्शनास आल्याने त्यांनी पोलीस स्टेशन गाठत कळवे येथील सचिन पेंटर नामक आरोपी विरोधात तक्रार दाखल केली आहे. सदर घटनेमुळे हमरापूर विभागासह पेण तालुक्यात संतापाची लाट पसरली आहे.

सविस्तर घटना अशी की, दादर सागरी पोलीस स्टेशन हद्दीत २८ एप्रिल ते ११ ऑक्टोबर २०२४ रोजी च्या दरम्यान कळवे येथे सदर पिडीत मुलगी ही आपल्या नातेवाईकांसोबत लग्न कार्यासाठी आली असता आरोपीने घराचे बेडरूम मध्ये महिला फिर्यादी यांची मुलगी वय १२ वर्षे ०६ महीने ही घराचे बेडरूम मध्ये झोपली असता तसेच पिडीत मुलगी ती अल्पवयीन आहे हे आरोपी यास माहीत असताना देखील तिच्या एकटेपणाचा फायदा घेत आरोपीने पिडीत मुलीच्या (गुप्तांग) येथे हात लावुन तिच्या स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे घृणास्पद कृत्य केले व अश्लील चाळे करीत राहिला. मात्र सदर घटना घरच्यांच्या लक्षात आल्याने पिडीत मुलीच्या आईने पोलीस स्टेशन गाठत तक्रार दाखल केली.

सदर घटने बाबत दादर सागरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ८०/२०२४ भा. दं.वि.क.३५४, बाल लैंगिक अत्याचार संरक्षण (पोक्सो) अधिनियम, २०१२ चो कलम, ८, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून दादर सागरी पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी नागेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई गुरुनाथ विशे हे अधिक तपास करीत आहेत.

# केडीएमसी क्षेत्रातील घनकचरा प्रकल्पाचा नेदरलॅन्डच्या शिष्टमंडळाने केला पाहणी दौरा

कल्याण : किंगडम ऑफ नेदरलॅन्डचे कंन्सुलेट जनरल थीअरी व्हॅन हेल्डन व इतर शिष्टमंडळ यांच्या निवेदनानुसार घनकचरा व्यवस्थापनाबाबत कल्याण डोंबिवली महानगरपालिका राबवित असलेल्या घनकचरा प्रक्रीया प्रकल्पाच्या पाहणी दौ-याचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होते. यावेळी शिष्टमंडळ व नेदरलॅन्ड मधील इतर कंपन्यांनी नेदरलॅन्डमध्ये राबविण्यात येणा-या घनकचरा प्रकल्प, वेस्ट टु एनर्जी प्रकल्प, बायोगॅस प्रकल्प, हवा प्रदुषण नियंत्रण उपकरणे तसेच क्लियर रिवर, पर्यावरण विषयक दृकश्राव्य माध्यमातून सादरीकरण करून हवा व पाणी प्रदुषण नियंत्रण व नदी स्वच्छता कशी राखता येईल व त्यासंबंधीच्या उपाययोजना याबाबत मार्गदर्शन केले. याकामी वापरण्यात येणा-या उपकरणांची माहिती दिली.

यावेळी महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, योगेश गोडसे, भिवंडी-निजामपूर महानगर पालिकेचे अतिरिक्त आयुक्त देवीदास पवार, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील, कार्यकारी अभियंता योगेश गोटेकर, उल्हासनगर महानगरपालिकेच्या सहा. आयुक्त मयुरी कदम हे उपस्थित होते. संबंधित शिष्टमंडळाने महापालिका अधिका-यांसमवेत उंबर्डे, बारावे एकात्मिक घनकचरा प्रकल्प, आधारवाडी बायोमायनिंग प्रकल्प तसेच वालधुनी नदीची पाहणी केली. देशभरात घनकचरा प्रक्रीया प्रकल्प राबविणेकामी महाराष्ट्र सरकार व नेदरलॅन्ड सरकार यांनी सामंजस्य करार केला आहे.भारतामध्ये प्रती वर्षी सुमारे ६० मिलीयन मेट्रीक टन घनकच-याची निर्मिती होत आहे. देशातील घनकच-याची जटिल समस्या सोडविणेसाठी भविष्यात काय उपाययोजना करता येतील याचा विचार करता, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत उपाययोजना करणे आवश्यक आहेत. असे मत नेदरलॅन्डच्या शिष्टमंडळाने व्यक्त केले. याकामी केंद्र शासनामार्फत तसेच एमएमआरडीए च्या माध्यमातून निधी प्राप्त झाल्यावर महापालिका क्षेत्रात टप्प्याटप्प्या हि कामे हाती घेण्यात येतील, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांनी दिली. या पाहणी दौ-याचा कल्याण डोंबिवली महापालिका व एमएमआर क्षेत्रामध्ये निश्चित फायदा होणार आहे.

## रुग्णांची लूट...

पान १ वरून ▶▶ विश्वासर्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. महाडमधील खासगी रुग्णालयांत १,१६९ सीजर २० महिन्यांत झाल्याचे समोर आलंय, या प्रसुतीसाठी गरोदर महिलेला रुग्णालयात दाखल केल्यानंतर विविध कारणे देऊन रुग्णांच्या नातेवाइकांना घाबरवले जाते. काही ठिकाणी ३० हजार तर काही ठिकाणी ६० हजारांपेक्षा अधिक रक्कम सीजर करण्यासाठी संबंधित रुग्णालयांकडून उकळण्यात येते. त्यामुळे महाड शहरातील डॉक्टरांची भूमिकादेखील संशयाच्या भोवऱ्यात आली आहे. येथील शेख पॉली क्लिनिकमध्ये गत २० महिन्यात ४४० महिला प्रसूतीसाठी आल्या होत्या, त्यातील ३४४ महिलांचे सीजर करण्यात आले आहे.

तर, शहरातील निर्मल सुधा नर्सिंग होममध्ये तब्बल १०८५ महिला प्रसुतीसाठी आल्या असता ६७६ महिलांचे सीजर करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. तसेच, सुकाळे नर्सिंग होम हॉस्पिटल मध्ये २१८ महिला प्रसुतीसाठी दाखल करण्यात आल्या असता १५२ महिलांचे सीजर करण्यात आले आहे. शहरातील या तिन्ही हॉस्पिटलमध्ये मिळून १ हजार ७४३ पैकी तब्बल १ हजार १६९ महिलांचे सीजर प्रसुतीदरम्यान करण्यात आले आहे.

**डॉक्टरांकडून कारणे दाखवा नोटीस**

खासगी रुग्णालयीतल महिलांच्या प्रसुतीदरम्यान होत असलेली सीजरची संख्या लक्षात घेता, महाड ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांकडे एका महिलेकडून तक्रार करण्यात आली होती. महिलेच्या या तक्रारीची दखल घेत चौकशी केली असता हा सर्व धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यानंतर, या रुग्णालयांना कारणे डॉ.शंतनु डोईफोडे (अधीक्षक महाड ग्रामीण रुग्णालय) यांच्याकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. मात्र, डॉक्टरांकडून अशाप्रकारे पैसे कमावण्याच्या हेतुने सीजर होत असेल तर वैद्यकीय क्षेत्रावरील विश्वास पुन्हा एकदा गमावत चालला असल्याचे दिसून येते.

## ५टक्के रेडीरेकनर दर...

पान १ वरून ▶▶ असे व्यवहार नियमित करण्यासाठी रेडरिकनरच्या २५ टक्के इतके शुल्क शासनदरबारी भरावे लागत होते. या दंडाची रक्कम मोठी होत असल्याने असे व्यवहार नियमित करण्यासाठी कोणी पुढे येत नव्हते.

या सर्व पार्श्वभूमीवर महसुलाशी संबंधित असलेल्या महत्त्वाच्या कायद्यांचा अभ्यास करण्यासाठी आणि आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाने उमाकांत दांगट यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने तुकडेबंदीचे व्यवहार नियमित करण्यासाठी रेडरिकनरच्या २५ टक्क्यांऐवजी १० टक्के इतके शुल्क आकारावे, अशी शासनास शिफारस केली होती. मात्र, शासनाने या शुल्कात आणखी कपात करत ५ टक्के इतके शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे.

## आझाद मैदानात उपोषण...

पान १ वरून ▶▶ कारवाईचा फक्त देखावा केला. त्यानंतर ही बेकायदा बांधकामे पुन्हा जशीच्या तशी उभी राहिली आहेत, असे जोशी यांनी सांगितले.

गेल्या दोन वर्षापासून आपण डोंबिवली पश्चिमेतील कोपर भागातील सखारामनगर कॉम्पलेक्सच्या बाजुला पालिकेच्या बगिचा, उद्यान, शाळा अशा आरक्षित भूखंडावर उभारलेली चार बेकायदा इमारतींची बांधकामे, याच भागात स्मशानभूमी रस्त्यावर, चरू बामा म्हात्रे शाळेच्या पाठीमागील बांधकाम, रेतीबंदर चौकात अतिथी हॉटेलसमोर उभारलेल्या तीन इमारती, गावदेवी मंदिर मैदानाजवळील शशिकांत व मधुकर म्हात्रे यांची बेकायदा इमारत, कुंभारखाणपाडा येथील हरितपट्ट्यावरील शिव सावलीसह इतर बेकायदा इमारती, खंडोबा मंदिराजवळील बेकायदा इमारत, नवापाडा पालिका शाळेजवळील बेकायदा इमारत, प्रसाद सोसायटी प्रभागातील दत्तमंदिर दोन गल्लीतील बेकायदा इमारत, जुनी डोंबिवली, ठाकुरवाडीतील शिव लिला, मोठागाव भागातील बेकायदा इमारतींच्या तक्रारी पालिका आयुक्त, अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त, ह प्रभाग साहाय्यक आयुक्त यांच्याकडे केल्या आहेत. न्यायालयात जाण्याची आपली आर्थिक परिस्थिती नसल्याने आपण सनदशीर मार्गाने या बेकायदा बांधकामांविरुध्द लढा देत आहोत, असे जोशी यांनी सांगितले.

ह प्रभागाचे साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांनी सांगितले, विनोद जोशी यांनी केलेल्या तक्रारींची चौकशी केली जात आहे. काही बांधकामांना नोटिसा दिल्या आहेत. बांधकामधारकांना कागदपत्रे सादर करण्याचे कळवून सुनावण्या घेण्यात येणार आहेत. बांधकामधारक कागदपत्रे सादर करण्यास आले नाहीतर ती बांधकामे अनधिकृत घोषित करून तोडली जाणार आहेत.

**नगरविकास विभागाचे आदेश**

शासनाच्या नगरविकास विभागाचे कक्ष सचिव रश्मिकांत इंगोले यांनी कल्याण डोंबिवली पालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांना पत्र पाठवून उपोषणकर्ते विनोद जोशी यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने उचित कारवाई करण्याचे आणि त्यांना उपोषणापासून परावृत्त करण्याचे आदेश दिले आहेत.

## ठेकेदाराचा आडमुठेपणा...

पान १ वरून ▶▶ १ २ मीटरच्या ६० बसची खरेदी करण्यात येणार आहे. या १६० वातानुकुलित ई बसच्या खरेदी, संचलन (चालकासह) आणि देखभालीसाठी टीएमटी प्रशासनाने निविदा प्रक्रिया राबवली होती. मात्र, ठेकेदारांनी जादा दराची अपेक्षा ठेवल्याने परिवहन व्यवस्थापनाने हे प्रस्ताव धुडकावले असून १६० ई बससाठी फेरनिविदा काढली आहे.

ठाण्यात नागरीकरण वाढल्याने दिवसेदिवस वाढत असलेला प्रवासी संख्या लक्षात घेऊन टीएमटीच्या ताफ्यात इलेक्ट्रिक वातानुकुलीत १० डबल डेकर बस दाखल करण्याचे ठरले होते. मात्र, टीएमटी प्रशासनाने याबाबत अद्याप काहीच हालचाली केलेल्या नाहीत. किंबहुना, डबल डेकर बसेस वगळून केवळ १६० ई वातानुकुलित बससाठीच निविदा प्रक्रिया राबवली असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. दरम्यान डबल डेकरचा प्रस्ताव तूर्तास बासनात गेला असल्याने ठाणेकरांची डबल डेकर बसमधून फिरण्याची स्वप्ने लांबणीवर गेली आहेत.

## विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर...

पान १ वरून ▶ रुग्णालयामध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले असले तरी सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले. रुग्णालयात दाखल असलेल्या विद्यार्थ्यांची काळजी ठामपा प्रशासन व रुग्णालयाची तज्ज्ञ टीम घेत असल्याची माहिती शिक्षण विभागाचे उपायुक्त जी.जी. गोदेपुरे यांनी दिली.

सदर घटनेची माहिती अन्न व औषध प्रशासनाला देण्यात आली असून संबंधित विभागाचे पथक घटनास्थळी दाखल होवून त्यांनी अन्नाचे नमुने घेतले व संपूर्ण किचनची व परिसराची पाहणी केली. संपूर्ण चौकशीअंती संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल असे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले.

## आतकोली कचरा प्रकल्पास...

पान १ वरून ▶▶ आणुन एका टप्प्यात कचऱ्याचे वर्गीकरण व दुसऱ्या टप्प्यात हरीत कोळसा निर्मीती प्रकल्प राबविण्यात येणार असून शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावली जाणार असल्याचे सांगण्यात आले तर या प्रकल्पा शेजारीच गावे, घरे, शेती असुन जवळच आंतरराष्ट्रीय क्रीडांगण ठाणे ग्रामीणचे पोलीस मुख्यालय, वसाहत, जेल साठी जमीन प्रस्तावित केली असुन जवळच नदी, पिसे डॅम आहे या घनकचरा प्रकल्पामुळे परिसरात त्यांचे प्रदुषण, दुष्परिणाम दिसणार असुन नागरीकांचे आरोग्य धोक्यात येणार आहे तसेच हजारो एकर जमीनींवरील विकास खुंठणार असल्याचे शिवसेना उपनेते प्रकाश पाटील आमदार शांताराम मोरे समाजसेवक भगवान सांबरे यांनी सांगितले तर या प्रकल्पा व्यतीरीक्त दुसरा कुठलाही प्रकल्प आल्यास त्याला सहकार्य करण्याचे आश्वासन स्थानिकांनी दिले. तर हा प्रकल्प डोंगराच्या कडेला किंवा इतरत्र जमीनीवर हलवण्याची विनंती करण्यात आली. तसेच आचारसंहिता काळात पोलीस बंदोबस्त घेऊन कचरा आणण्यास ठाणे महापालिकेने सुरूवात केल्यास विरोध करुन संघर्ष करणार असल्याचा इशारा स्थानिक शेतकरी रमेश शेलार व उपस्थीत नांगरीकानी दिला यावेळी उपस्थित अप्पर पोलीस अधीक्षक भारत तांडकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी ठाणे महापालिकेचे उपायुक्त जोशी, स्थानिक गुन्हे शाखेचे सुरेश मनोरे पडघा पोलीस निरीक्षक बांळा कुंभार सह परिसरातील सर्वपक्षीय पदाधिकारी, नागरीक स्थानिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रियांका राऊत यांची निवड...

पान १ वरून ▶ देण्यासाठी शिवसेना तालुका प्रमुख वसंत लोणे, सुरेश पिंताबरे, बुधाजी राऊत, दिपक भोईर, कुणाल पवार, गिरीश भोईर, सचिन पिंताबरे, यांच्या सह आदि उपस्थित होते,

शिवसेना तालुका प्रमुख वसंत लोणे यांनी सांगितले की अपेक्षा फेक्षा जास्त सदस्य आमच्या बाजुने आसल्याने विजय झाला आहे,विरोधकांनी आता समजून जावे,तसेच विकास करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे आले पाहिजे असे सांगितले, कुठल्याही अनुचित प्रकार घडु नये म्हणुन चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता,

# राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी आचारसंहितांचे पालन करावे

### - निवडणूक अधिकारी अमित सानप




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार विधानसभेची निवडणूक सुरवात झाली आहे. मतदान प्रक्रीयेतील सर्वात महत्वाचा टप्पा म्हणजे नामनिर्देशन पत्र स्विकारणे हा आहे. जे इच्छुक उमेदवार अर्ज भरणार आहेत . उमेदवार यांना नामनिर्देशन भरताना काही अडचण असल्यास त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी अमित सानप यांनी केले आहे. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सुचित केले की, उमेदवारांने नामनिर्देशन पत्र भरताना अचुक भरा, तसेच नामनिर्देशन भरताना सोबत जोडावयाचे प्रतिज्ञापत्रे भरताना सर्व तपशील व्यवस्थित पुर्ण भरा. उमेदवारांने व त्याचे प्रतिनिधी यांचे अलिकडील काळातील काढलेले सहा फोटो नामनिर्देशन अर्जा सोबत घेवून येणे अपेक्षीत आहे. मतदान प्रक्रीयेतील सर्वात महत्वाचा टप्पा म्हणजे नामनिर्देशन पत्र दाखल करणे, कमीत कमी वेळात नामनिर्देशन पत्र तपासून नामनिर्देशन पत्र स्विकारण्यात येतील बिनचूक नामनिर्देशन पत्र भरणे आवश्यक आहे, अशी माहिती १३७ भिवंडी पूर्व निवडणूक निर्णय अधिकारी अमित सानप यांनी दिली आहे. विधानसभेच्या निवडणुकीकरीता उमेदवाराने स्वतंत्र बँक खाते उघडावे व त्या खात्यातून सर्व निवडणूक खर्च करावा. प्रत्येक उमेदवाराला निवडणूक खर्चाची मर्यादा ४० लाख आहे. या खर्चाची स्वतंत्र तपासणी केंद्रीय खर्च निरीक्षक करतील. उमेदवार यांच्या बरोबर केवळ तीन वाहनांना १०० मीटरच्या आत मध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. नामनिर्देशन भरताना केवळ उमेदवारासह पाच प्रतिनिधी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहू शकतात.

निवडणूक प्रचारासाठी सर्व प्रकारच्या परवानग्या घेणे कामी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात एक खिडकी योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. उमेदवाराच्या प्रचारासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या घेणे आवश्यक आहे, कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता प्रचार केल्यास नियमानुसार कारवाई करणार असा ईशारा निवडणूक निर्णय अधिकारी अमित सानप यांनी दिला. उमेदवाराचा प्रचार सभा, रँली याचे सर्वांचे व्हीडीओ शुटींग करण्यात येणार आहे. प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या निकषावर सर्व परवानग्या देण्यात येतील. कोणत्याही प्रकारची पुर्व परवानगी न घेता कोणत्याही प्रकारचे प्रचाराचे साहित्य प्रसिध्द करण्यात येऊ नये, तसेच कोणतीही परवानगी नसताना कोणतेही वाहन वापरता येणार नाही किंवा तसेच कोणताही प्रचार करता येणार जर नियमांचे व कायद्यांचे उल्लघंन झाल्यास त्या उमेदवार व पक्षावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल असा इशारा देखील निवडणूक निर्णय अधिकारी अमित सानप यांनी दिला आहे. या बैठकीला वेगवेगळ्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# नांदेड लोकसभेसाठी रविंद्र चव्हाण यांना उमेदवारी



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** राज्यातील विधानसभा निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर नांदेडमधील (र्ह्रा) पोटनिवडणुकांची घोषणा मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी केली आहे. राज्यातील विधानसभेसाठी एकाच टप्प्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे. त्याचप्रमाणे नांदेड लोकसभा (र्थ्दर्ठ्) पोटनिवडणुकीसाठी देखील २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून काँग्रेसकडून उमेदवाराची घोषणा करण्यात आली आहे. काँग्रेसने अधिकृतपणे परिपत्रक जारी करत नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी रविंद्र चव्हाण यांची उमेदवारी जाहीर केली आहे. रविंद्र चव्हाण हे नांदडचे दिवंगत खासदार वसंत चव्हाण यांचे सुपुत्र आहेत. दरम्यान, काही महिन्यांपूर्वी वसंत चव्हाण यांचे निधन झाल्यामुळे येथील जागेवर पोटनिवडणूक घेण्यात येत आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गेल्याच महिन्यात महाराष्ट्र दौरा केला होता, त्यावेळी नांदेडमध्ये दिवंगत खासदार वसंत चव्हाण यांच्या घरी जाऊन सांत्वनपर भेट घेतली होती. त्याचावेळी, येथील पोटनिवडणुकीतसाठी रविंद्र चव्हाण यांनाच उमेदवारी देण्यात येईल, असे त्यांच्याकडून सांगण्यात आलं होतं. आता, काँग्रेस सरचिटणीस के.सी. वेणुगोपाल यांच्या सहीने पत्र जारी करण्यात आले असून रविंद्र चव्हाण यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. यासह, मेघालय येथील विधानपरिषद निवडणुकीसाठी जिंगजँक मरक यांना संधी देण्यात आली आहे. काँग्रेसकडून या २ उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळे, आता नांदेड लोकसभा निवडणुकीसाठी भाजप महायुतीकडून कोणाला उमेदवारी देण्यात येईल, याची चर्चा राजकीय वर्तुळात असून अनेकांना उत्सुकता लागून आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचा प्रतापराव चिखलीकर यांना पराभवाची धूळ चारत नांदेड जिल्ह्यातील अशोक चव्हाण आणि भाजपच्या अजस्त्र ताकदीला धक्का देत विजय खेचून आणणारे काँग्रेसचे आमदार वसंत चव्हाण यांचे २६ ऑगस्ट रोजी अकाली निधन झाले होते. त्यांच्या जाण्याने काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसला होता. त्यांच्या अचानक जाण्याने वसंत चव्हाण यांची गादी त्यांच्या चिरंजीवानेच चालवावी असे काँग्रेसला वाटत होते. त्यामुळे लोकसभा पोटनिवडणुकीसाठी रवींद्र चव्हाण यांच्या उमेदवारीचा जिल्हा काँग्रेसने ठरावही संमत केला होता. त्यानंतर, आज अधिकृतपणे दिल्लीतील काँग्रेसकडून रविंद्र चव्हाण यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. भाजपमधून नांदेडच्या लोकसभा पोट निवडणुकीसाठी काही नावे समोर येत असून नक्की कोणाला उमेदवारी दिली जाणारी याकडे सर्वांचे लक्ष आहे.

# समीर वानखेडे विधानसभेच्या रिंगणात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबई : भारतीय महसूल सेवेचे अतिरिक्त आयुक्त समीर वानखेडे विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, समीर वानखेडे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून मैदानात उतरणार आहेत. समीर वानखेडे मुंबईमध्ये मैदानात उतरणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. मविआ सरकारच्या काळात समीर वानखेडे चर्चेत आले होते. समीर वानखेडे सध्या चेन्नईमध्ये सरकारी नोकरी करत आहेत.

मुंबईतील धारावी विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेकडून आयआरएस अधिकारी समीर वानखेडे यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. धारावी विधानसभा मतदारसंघ हा आरक्षित मतदारसंघ आहे. या मतदारसंघातून आयआरएस अधिकारी समीर वानखेडे यांच्या नावाची चाचपणी शिवसेनेकडून केली जात आहे. वर्षा गायकवाड यांच्या मतदारसंघात समीर वानखेडे यांना शिंदेसेना उतरवण्याची शक्यता आहे. वर्षा गायकवाड संसदेत गेल्या आहेत. या मतदारसंघात आता ज्योती गायकवाड काँग्रेसकडून लढणार असल्याचे समजतेय. ज्योती गायकवाड यांच्याविरोधात समीर वानखेडे लढणार आहेत.

दोन दिवसांपूर्वी राज्यात विधानसभा निवडणुकीची घोषणा झाली. २० नोव्हेंबर रोजी मतदान तर २३ नोव्हेंबर रोजी निकाल लागणार आहे. विधानसभा निवडणुकीची घोषणा होताच उमेदवारांची जुळवाजुळव सुरू झाली आहे. महायुतीच्या जागावाटपात धारावीचा मतदारसंघ एकनाथ शिंदे यांना मिळाला आहे, त्याजागी समीर वानखेडे मैदानात उतरण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे

# मतदानासाठी मतदार यादीत नाव आवश्यक

### - मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक सन २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला असून दि. २० नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रातील एकूण २८८ विधानसभा मतदारसंघात एकाच टप्प्यात मतदान घेणार आहे. या निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी आपले नाव मतदार यादीत समाविष्ट असणे आवश्यक आहे, ज्यांनी आपले नाव मतदार यादीत अद्याप समाविष्ट केलेले नाही त्यांना अजूनही दि. १९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत मतदार यादीत आपले नाव नोंदवण्याची संधी आहे, तरी आपले नाव आर्वजून मतदार यादीत समाविष्ट झाले असल्याची खात्री प्रत्येक मतदाराने करावी. तसेच ज्यांनी अजून आपले नाव मतदार यादीत समाविष्ट केले नाही त्यांनी तातडीने १९ ऑक्टोबरच्या आत आपले नाव मतदार यादीत नोंदवावे, जेणेकरुन मतदानाच्या दिवशी मतदानाचा आपला हक्क मतदारांना बजावता येईल, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस.चोक्कलिंगम यांनी केले. अजूनही ज्यांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवलेले नाही त्यांना दि. १९ ऑक्टोबर रोजी रात्री पर्यंत ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने मतदार यादीत नाव नोंदणी करण्याची संधी उपलब्ध असून निरंतर मतदार नोंदणीचा कार्यक्रम अद्याप सुरु आहे. त्यामुळे ज्या पात्र नागरिकांची आतापर्यंत मतदार नोंदणी झालेली नाही, अशा नागरिकांकडून उमेदवारांचे नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या अंतिम दिनांकाच्या १० दिवस अगोदरपर्यंत म्हणजेच दि.१९ ऑक्टोबर पर्यंत प्राप्त झालेले अर्ज क्र. ६ मतदार यादीमध्ये नोंद घेण्यासाठी विचारात घेण्यात येतील. तरी या संधीचा लाभ घेऊन सर्व पात्र नागरिकांनी मतदार यादीत आपले नाव समाविष्ट करत मतदानाचा आपला हक्क आर्वजून बजावावा, तसेच सर्व मतदारांनी आपले नाव मतदार यादीत समाविष्ट असल्याची खात्री तातडीने करुन घ्यावी, असे आवाहन श्री.चोक्कलिंगम यांनी केले आहे.


## जाहिर नोटिस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड यांचे कार्यालय, मुरबाड**

**जा.क्र. फौजदारी/जन्म मृत्यु नोंद/कावि ४१८/२०२४**

**प्रति,**

१) **श्री. तुकाराम बळीराम आगिवले,** राहणार **रा. शिरवली, ता. मुरबाड, जि. ठाणे,** अर्जदार

**विरुद्ध**

२) ग्रामपंचायत **शिरवली**, जन्म मृत्यु नोंदणी विभाग, ता. मुरबाड, जि. ठाणे सामनेवाले

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे:

१. उपरोक्त अर्जदार यांचे **वडील कै. बळीराम कान्हु आगिवले** यांचा मृत्यु दिनांक ०५/०७/१९९२ रोजी राहत्या घरी मु. शिरवली, ता. मुरबाड, जि. ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडून काही अपरिहार्य कारणांमुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्म / मृत्युची नोंद निबंधक, जन्म, मृत्यु नोंदणी विभाग, ता. मुरबाड, जि. ठाणे दप्तरी करुन जन्म/ मृत्युचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहिला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांसाठी जन्म/ मृत्यु दाखल्याची आवश्यकता आहे.

२. उशीरा मृत्युची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करून घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज क्र. **७७६** दाखल केला आहे.

३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे त्यांच्या वडीलांचा जन्म / मृत्युच्या नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे १७/१०/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

शिक्का

**सही /-**
**हुकूमावरुन**
**(श्रीम. सुषमा अव्हाड- बांगर)**
**निवासी नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड**


# डोंबिवलीतील वाहन कोंडी आठ दिवसात सोडवा

### वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ यांचे आदेश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

डोंबिवली :डोंबिवलीतील काही रस्त्यांवर सम, विषम तारखेप्रमाणे वाहने उभी करण्यास सुरूवात करा. काही रस्ते एक मार्गिका करा, मुख्य वर्दळीचे रस्ते, चौकांमध्ये एकही फेरीवाला दिसणार नाही याचे नियोजन करा आणि डोंबिवली शहरात येत्या आठ दिवसानंतर वाहतूक कोंडी होणार नाही याचे नियोजन करा, असे आदेश वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ यांनी गुरुवारी डोंबिवली दौऱ्यात दिले.

डोंबिवली पश्चिम भागात दररोज वाहतूक कोंडी होत असल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. या पार्श्वभूमीवर लोकसत्ताने आवाज उठविताच गुरुवारी दुपारी उपायुक्त शिरसाठ तातडीने डोंबिवलीत दाखल झाले. त्यांच्या सोबत साहाय्यक पोलीस आयुक्त संजय साबळे, कोळसेवाडी वाहतूक विभागाचे वरिष्ठ निरीक्षक सचिन सांडभोर, डोंबिवली वाहतूक विभागाचे उपनिरक्षक गोपीनाथ आढाव, साहाय्यक उपनिरीक्षक अनंत कदम, हवालदार शशिकांत गांगुर्डे, रिक्षा संघटनेचे अंकुश म्हात्रे, शेखर जोशी, राजा चव्हाण, कैलास यादव, साहाय्यक आयुक्त राजेश सावंत, अधीक्षक अरूण पाटील उपस्थित होते.

डोंबिवली पश्चिमेतील फुले रस्त्यावरील कोल्हापुरे चौक, गोपी चौक, प्रसाद स्नॅक्स भागात दररोज संध्याकाळी सात ते रात्री उशिरापर्यंत वाहतूक कोंडी होते. प्रवाशांना या कोंडीचा त्रास होतो. या चौकात वाहतूक पोलीस तैनात नसल्याने एक तास या भागातील कोंडी सुटत नाही. कामावरून घरी परतणाऱ्या नोकरदारवर्गाला या कोंडीचा सर्वाधिक फटका बसतो.या सततच्या कोंडीचे वृत्त लोकसत्तामध्ये गुरुवारी प्रसिध्द होताच, वाहतूक उपायुक्त शिरसाठ दुपारी डोंबिवलीत दाखल झाले. त्यांनी येत्या आठ दिवसात योग्य नियोजन करून शहरातील वाहन कोंडी सोडविण्याचे आदेश डोंबिवली वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. वर्दळीचे रस्ते, चौक भागात एकही फेरीवाला बसणार नाही याचे नियोजन पालिकेने करावे. रेल्वे स्थानकापासून दीडशे मीटर भागात एकही फेरीवाला दिसता कामा नये. प्रवाशांना रेल्वे स्थानक भागात उतरविणे, प्रवासी वाहनतळावर येणे यासाठी योग्य नियोजन करा. रस्त्यांवरील वाहनतळांसाठी सम, विषम तारखा निश्चित करा. अशाप्रकारचे योग्य नियोजन करून या नियोजनाची अंमलबजावणी करण्याचे आदेश उपायुक्त शिरसाठ यांनी वाहतूक अधिकाऱ्यांना दिले.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी